# लोकसंगीत व शास्त्रीय संगीत यामधील होणारे बदल आणि विकास

**प्रा. दिपक महादेव जामनिक**

अशोक मोहरकर कला व वाणिज्य महाविद्यालय, अडयाळ
ता. पवनी, जि. भंडारा (महाराष्ट्र)
मो.नं. 8552991420

---

**प्रस्तावना –**

लोकसंगीत व शास्त्रीय संगीत यामधील होणारे बदल आणि विकास हे जाणुन घेण्याआधी लोकसंगीत म्हणजे काय? शास्त्रीय संगीत म्हणजे काय? लोकसंगीत व शास्त्रीय संगीत यांची उत्पत्ती केव्हा झाली? आणि त्यांच्यामध्ये बदल व विकास कसा होत गेला या संदर्भाविषयी चर्चा करत असतांना आपल्याला भारतीय संगीताच्या इतिहासाकडे एक दृष्टीक्षेप टाकावे लागेल.

1) **भारतीय संगीताची उत्पत्ती -**

भारतीय संगीताचा इतिहास हा अतिप्राचीन मानल्या जातो. संगीताची उत्पत्ती कशी झाली आणि केव्हा झाली हे कोणीच सांगु शकत नाही. अनेक ग्रंथामध्ये संगीताची उत्पत्ती बद्दल वेगवेगळी मते मांडलेली दिसुन येतात. काही विव्दान धार्मिक दृष्टीकोण मांडतात. तर काही वैज्ञानिक दृष्टीकोण मानतात. तर काही विव्दान पाण्याच्या प्रवाहामधुन संगीताची उत्पत्ती झाली. तर काही म्हणतात की, पक्षाच्या आवाजाव्दारा संगीताची उत्पत्ती झाली परंतु संगीताची उत्पत्ती केव्हा झाली हयाचे ठोस प्रमाण कोणीही देवू शकत नाही. माझ्या मतानुसार संगीताची उत्पत्ती मानवाने निर्माण केली. जेव्हा मानव बोलु लागला, वेगवेगळया प्रकारची आवाज काढु लागला, उंच निच आवाज काढु लागला तेव्हा संगीताची उत्पती झाली असावी.

2) **लोकसंगीत म्हणजे काय?**

लोकसंगीत म्हणजे लोकांचे आवडते गीत. लोक चा अर्थ आहे जनसाधारण व्यक्ती, संगीत चा अर्थ आहे गायन, वादन, नृत्यांचे मिश्रण म्हणून लोकसंगीताचा अर्थ होतो. साधारण लोकांकडुन गायल्या जाणा-या गीताला लोकसंगीत म्हणतात. लोकसंगीत हे प्रत्येक मानवाच्या ओठावर गातांना आढळून येते ते लोकसंगीत.

3) **शास्त्रीय संगीत -**

शास्त्रीय म्हणजे गणितीय पध्दतीने गायले वाजविले जाते ते शास्त्रीय संगीत होय. एक अधिक एक बरोबर दोन होतात ते शास्त्रीय संगीतामध्ये स्वर, ताल, लय हया सर्व बाबी पाळल्या जातात आणि गायन करत असतांना तानपूरा, तबला, हार्मोनियमची संगत आवश्यक असते.

4) **प्राचीन काळातील लोकसंगीत -**

हया काळात संगीतामध्ये वादयांचा जन्म झाला. हया काळात संगीतामध्ये दगडाचा बनविलेला वादय आपल्याला दिसुन येतो त्याचं नाव आहे "अग्सा" प्राचीन काळामध्ये लोकसंगीत गीत सुध्दा गायलेली दिसुन येतात. जसे : प्रेमाचे गीत, पावसाळी गीत, मानव शिकार करत असतांना शिकारी गीत, दु:खाचे गीत, युध्दाचे गीत इत्यादी हया काळात विना व वादयांचा विकास झाला.

5) **वैदिक काळामध्ये लोकसंगीत व शास्त्रीय संगीत -**

वैदिक काळामध्ये चार वेद सांगितल्या जातात. ज्याला ऋग्वेद, यजुर्वेद, सामवेद, अर्थवेद म्हणतात. सामवेद मध्ये निव्वळ संगीत होते हया काळामध्ये आर्य लोकांना संगीतावर अधिक प्रेम होते. त्याचे संगीत ज्ञान अत्यंत उत्कृष्ट होते. हया काळात संगीत उच्च कोटीचे होते. हया काळात गायन, वादन, नृत्य ताला स्वरात होत होते. ऋग्वेद मध्ये संगीताचा विकास प्रत्येक घरामध्ये झालेला दिसून येतो. देवी देवतांची भक्ती करण्यासाठी संगीताचा प्रयोग केल्या जात होता. हया काळात प्रत्येक सामान्य माणूस शास्त्रीय संगीत ओळखत होता. हया काळात लोक समूहाने राहु लागल्यामुळे लोकसंगीताला सुध्दा वाव मिळत होता. हया काळात गायन, वादन, नृत्य हया तिन्ही प्रकारचे कलाकार मिळत होते. आणि समाजामध्ये संगीत तज्ञांना चांगल्या दृष्टीने पाहिल्या जात होते.

6) **मध्य काळामध्ये शास्त्रीय संगीत व लोकसंगीत -**

11 वी ते 13 वी च्या काळामध्ये मुस्लीमांनी भारतावर परीपूर्ण ताबा मिळविला होता. हया काळामध्ये शास्त्रीय संगीत व लोकसंगीताचा –हास झाला. मुसलमान जेव्हा भारतात आले तेव्हा त्यांचे काही संगीत तज्ञ पण आपल्या सोबत आणले होते. हया काळात शास्त्रीय संगीत व लोकसंगीताला मिळविण्याचे प्रयत्न केले होते. हया सर्व गोष्टींना निहाळुन पाहत असतांना मुस्लीम संगीत भारतीय शास्त्रीय संगीत व लोकसंगीताला नष्ट करु शकली नाही आणि शास्त्रीय संगीत व लोकसंगीताचा विकास होत गेला.

हया काळामध्ये अनेक संगीततज्ञ होवून गेले. ज्यांनी भारतीय संगीताला खुप मोठे योगदान दिले की त्यांनी शास्त्रीय संगीत वाढविण्याचे काम केले. त्यांचे नाव पुढीलप्रमाणे –

बैजु बावरा, गोपाल नायक, स्वामी हरीदास, तानसेन हे सर्व संगीताचे प्रेमी होते. हया काळामध्ये शास्त्रीय संगीताला जिवंत ठेवण्याचे व विकास घडवून आणण्याचे काम इत्यादी संगीत तज्ञांनी केले.

परंतु 19 व्या शताब्दीमध्ये भारतावर इंग्रजांनी परीपूर्ण राज्य स्थापीत केले व 1947 मध्ये भारत त्यांना सोडून द्यावा लागला. तर पाहु या इंग्रज काळातील मधील एक दृष्टीकोण.

7) **आधुनिक काळामध्ये शास्त्रीय संगीत व लोकसंगीत -**

हया काळामध्ये इंग्रजांनी भारतीय संगीताकडे बिलकुल लक्ष दिले नाही. ही कला मध्यम वर्गामध्ये जावुन पोहचली. वैश्यानी संगीतावर पुर्णपणे ताबा मिळविला होता. त्यांना आपल्या रंगामध्ये संगीताला रंगवून घेतले होते. त्यामुळे सुशिक्षित समाज संगीताला तुच्छ मानीत होते.

हया परिस्थितीमुळे संगीत तज्ञामध्ये स्वार्थी भावना निर्माण झाली. संगीततज्ञ आपले ज्ञान कुणालाही देत नव्हते सर्व संकुचीत वृत्तीचे बनले होते. हया काळामध्ये गुरू फक्त आपल्या शिष्यालाच संगीत शिकवित होते आणि एकमेकापासुन लपवुन ठेवत होते. हया लपविण्याच्या कारणामुळे घराणे उदयास आले. हया काळात मुख्य पाच घराणे निर्माण झाले.

1) ग्वालीयर घराणा, 2) आगरा घराणा, 3) किराणा घराणा, 4) दिल्ली घराणा, 5) जयपूर घराणा

150 वर्षानंतर गुलामीची श्रृंखला तुटून गेले आणि लोकांच्या मनामध्ये नविन कल्पना येवू लागल्या. नविन विचार येवू लागले अशाप्रकारे शास्त्रीय संगीत व लोकसंगीताचा विचारांचे आदान प्रदान होवू लागले. आणि शास्त्रीय संगीत व लोकसंगीताचा प्रचार प्रसार होवू लागला.

8) **आश्रमाच्या माध्यमातून शास्त्रीय संगीताचा विकास -**

विद्यालय, महाविद्यालय, शाळा नव्हत्या तेव्हा आश्रम शिक्षण घेण्याचा एक माध्यम होता. गुरू आश्रमात राहुनच शिष्टांना ज्ञान देते होते. जे काही शिष्यगण ज्ञान संपादन करत होते त्यामधून कलाकार उदयास येत होते म्हणजेच संगीताचा विकास होय.

9) **शास्त्रीय संगीतामध्ये पं. भातखंडे व पं. पलुस्कर यांचे योगदान -**

गुरूच्या सानिध्यात राहुन म्हणजेच आश्रमात राहुन संगीत शिकण्याचे मुभा होती. पं. भातखंडे व पलुस्कर यांना असे वाटले की, शास्त्रीय संगीत हे प्रत्येक घरापर्यंत पोहचले पाहीजे प्रत्येक घरातल्या व्यक्तीला संगीत कळलं पाहीजे. शास्त्रीय संगीत हे विद्यालय, महाविद्यालयात आणण्याचे काम त्यांनी केले. संगीताचा विकास व बदल घडविण्याचे काम अशा महान व्यक्तींनी केले. आज अनेक विद्यालय, महाविद्यालयामध्ये शास्त्रीय संगीत व लोकसंगीत शिक्षक शिकवितांना व विद्यार्थी शिकतांना आपल्याला दिसुन येते.

10) **रेडिओ, एफ.एम. च्या माध्यमातुन शास्त्रीय संगीत व लोकसंगीताचा विकास -**

रेडिओ, एफ.एम. ही आधुनिक काळातील उपज आहे. आकाशवाणीचा मुख्य उद्देश मनोरंजन असल्याने संगीताला प्राधान्य दिले जाते. शास्त्रीय संगीत, सुगम संगीत, नाटय संगीत, लोकसंगीत अश्या अनेक कार्यक्रमाचे देणे या संचाने केले आहे. शास्त्रीय संगीत व लोकसंगीत लोकांपर्यत पोहचविण्याचे काम रेडिओ, एफ.एम. नी केले. ख्याल, ठुमरी, गझल, लावणी, लोकगीत, भावगीत असे विविध कार्यक्रम आपल्याला ऐकायला मिळतात. आदी शास्त्रीय संगीत व लोकसंगीताचे कार्यक्रम कुठे सुरू आहे हे पाहावे लागत होते. मगं तिथे त्या ठिकाणी जावून बसावं लागत होते. पण एफ.एम. व रेडिओमुळे शास्त्रीय संगीत व लोकसंगीत आज आपल्या घरी बसुन ऐकु शकतो. संगीताचा विकास व बदल घडवून आणण्याचे काम एफ.एम., रेडिओनी केले.

11) **दुरदर्शनच्या माध्यमातुन शास्त्रीय संगीत व लोकसंगीताचा विकास -**

पुर्वीच्या काळी संगीत ही कला किल्ल्यामध्ये कैद होती त्यामुळे फार थोडया लोकांचे मनोरंजन होत असे. किर्तन, भजन, रामलिला, यात्रेमध्ये बसुन पाहावे लागत होते. मात्र दुरदर्शनच्या माध्यमातुन शास्त्रीय संगीत व लोकसंगीत आज आपल्याला घरी बसल्या ऐकायला व पाहायला मिळते. संगीताच्या विकासामध्ये बदल घडवून आणण्याचे काम दुरदर्शनने केले. पुर्वीच्या काळी शास्त्रीय संगीत किंवा लोकसंगीत ऐकायला दरबारामध्ये जावे लागत होते. मात्र आज आपण घरी बसल्या ऐकु शकतो, पाहु शकतो.

12) **लोकसंगीताच्या विकासामध्ये संतांचे योगदान -**

भारतीय संगीतामध्ये अनेक संत होवून गेले. उदा. संत मिराबाई, संत ज्ञानेश्वर, संत तुकाराम महाराज, संत कबीर, संत गाडगेबाबा यांनी लोकसंगीताचा विकास करण्याचे काम केले. संत कबीरांनी अनेक दोहे रचुन संगीतमय पध्दतीने गावून लोकांपर्यंत पोहचविण्याचे काम केले. तुकाराम महाराजांनी अनेक अभंग रचून, किर्तन, भजने करून लोकांचे मनोरंजन करून लोकांना चांगल्या मार्गाचा उपदेश दिला. संत गाडगेबाबांनी सुध्दा किर्तने, भजने गायली. लोकसंगीताचा विकास घडवून आणण्याचे काम अशा महान संतांनी केले.

**समारोप -**

लोकसंगीत व शास्त्रीय संगीत यामधील होणारे बदल आणि विकास हा विषय पडताळून पाहत असतांना आपल्याला असे दिसून येते की, प्राचीन काळामध्ये शास्त्रीय संगीत, लोकसंगीत हे एखाद्या मैफील मध्ये जावून बसुन पाहाव, ऐकावे लागत असे. आधुनिक काळामध्ये विविध उपकरणे आल्यामुळे आज आपल्याला घरी बसुन ऐकायला व पहायला मिळतात. हा बदल आणि विकास झालेला आपल्याला दिसून येतो.

**संदर्भ सुची -**


- संगीत मैनुअल - डॉ. शर्मा
- संगीत विशारद - वसंत
- भारतीय संगीताचा इतिहास - भागवत शरण शर्मा